आदिवासी विकास विभागांतर्गत संगणकीकरण करण्याकरीता प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) गठीत करणेबाबत

# महाराष्ट्र शासन

## आदिवासी विकास विभाग

## शासन निर्णय, क्रमांकः संगणक-२०१३/प्र.क्र.२१६/का.१

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

तारीख: १८ ऑक्टोबर, २०१३

**वाचा**

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- सीओएम १०९८ /प्र.क्र. २१२/ ९८/ ३९, दिनांक - ५ ऑक्टोबर, २००१

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- सीओएम १००१/प्र.क्र. १७४/०१ /३९ , दिनांक - २९ ऑक्टोबर २००१

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- डिआयटी / फाईल ०५ /१०० / ३९, दिनांक - २९ ऑक्टोबर, २००५

४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :- संकीर्ण-१०१० / प्र.क्र. ७३ / कोषा प्र-५, दिनांक -०७ डिसेंबर, २०१०

५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :- संकीर्ण -१०११ / प्र.क्र.४४/ विमा प्रशासन, दिनांक - २४ मार्च, २०११

६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :- संकीर्ण - १०११ / प्र.क्र.४५ / विमा प्रशासन, दिनांक - २४ मार्च, २०११

७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- मातंस / २०११/ प्र.क्र. १२५ / ३९, दिनांक - २३ / ०९ / २०११

**प्रस्तावना**

राज्याचे प्रशासन अधिक गतिमान तसेच लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय कामकाजाचे संगणकीकरण करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुषंगाने शासकीय विभाग / कार्यालयातील कामकाजाचे संगणकीकरण करण्यासाठी दिनांक २९/१०/२००१ च्या शासन निर्णयान्वये सर्वसमावेशक कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. तसेच या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांचे संगणकीकरण करण्याकरीता प्रकल्प अंमलबजावणी समिती ( PIC - Project Implementation Committee ) गठीत

करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार आदिवासी विकास विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालय निहाय स्वतंत्र समित्या करण्याऐवजी सर्व समावेशक एकच प्रकल्प अंमलबजावणी समिती गठित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

## शासन निर्णय

आदिवासी विकास विभाग (खुद्द) व आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांचे संगणकीकरण करण्याकरीता खालीलप्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी समिती ( PIC - Project Implementation Committee ) गठीत करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिका-यांचे पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग | अध्यक्ष |
| २. | सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग | सदस्य |
| ३. | आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक | सदस्य |
| ४. | आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | सदस्य |
| ५. | उप सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ६. | उप सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ७. | राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राचे प्रतिनिधी | सदस्य |
| ८. | समिती समोर विचारार्थ विषयाशी संबंधित कार्यालयप्रमुख / सहसचिव / उपसचिव. | सदस्य |
| ९. | उपसचिव (आस्थापना), आदिवासी विकास विभाग | सदस्य - सचिव |

२. या समितीस संगणकीकरणाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ते हार्डवेअर / सॉफ्टवेअर उपलब्ध करण्याकरीता पुरवठादार / सल्लागाराची निवड व इतर अनुषंगिक बाबी याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार असतील.

३. प्रकल्प अंमलबजावणी समितीव्दारे मंजूर झालेल्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार वित्त विभाग, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - विअप्र १०००/ प्र.क्र.४६/२००१/विनियम, दिनांक ११ जुलै,२००१ च्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, मधील भाग पहिला, उपविभाग तीनच्या अनुक्रमांक चार, परिच्छेद क्रमांक २७ ( २ ) नुसार राहतील. अशा प्रकारे मान्यता दिलेल्या प्रकल्पास अंमलबजावणीसाठी नियोजन विभाग किंवा माहिती तंत्रज्ञान विभागाच्या

मान्यतेची आवश्यकता राहणार नाही. ही मंजुरी देताना अंमलबजावणी समिती सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक - सीओएम १००१ / प्र.क्र. १७४ / ०१ / ३९, दिनांक २९/१०/२००१ च्या परिच्छेद ९ ची अंमलबजावणी कटाक्षाने होईल याची दक्षता घेईल. प्रकल्प मंजुरीबाबत एकवाक्यता झाली नाही तर असे प्रकल्प माहिती तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णय, दिनांक ५ ऑक्टोबर,२००१ अन्वये गठित केलेल्या उच्चाधिकार समितीकडे मान्यतेस्तव सादर करावे लागतील.

४. सदर शासन निर्णयानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीने मान्यता दिल्यानंतर संगणकीकरण व तदनुषंगिक बाबी म्हणजेच संगणक इत्यादी आवश्यक यंत्र सामुग्रीची खरेदी तसेच संगणक प्रणालींचे विकसन (software development) उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयांनुसार व वेळोवेळी निर्गमित होणा-या शासन निर्णय / परिपत्रकांनुसार, निश्चित केलेल्या धोरणानुसार करण्यात यावे.

५. आवश्यकतेनुसार वेळोवेळी समितीच्या बैठका घेण्यात याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१३१०१९११४५२७६७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suryawanshi Anil D

Digitally signed by Suryawanshi Anil D
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=MTD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Suryawanshi Anil D
Date: 2013.10.19 11:47:52 +05'30'

**(अ.दि. सुर्यवंशी)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव

२) मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे यांचे खाजगी सचिव

३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०००३२

४) मा.प्रधान सचिव (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई-४०००३२

५) मा.प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई-४०००३२

६) मा.प्रधान सचिव, नियोजन विभाग

७) मा.सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग

८) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक

९) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

१०) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे / नाशिक / अमरावती / नागपूर

११) सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे /पुणे / नाशिक / नंदुरबार / औरंगाबाद / अमरावती / नागपूर / गडचिरोली

१२) उप सचिव, नियोजन विभाग

१३) उप सचिव, उद्योग विभाग

१४) सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव, आदिवासी विकास विभाग

१५) सर्व कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग

१६) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

१७) राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राचे प्रतिनिधी

१८) निवड नस्ती, कार्यासन-१, आदिवासी विकास विभाग.